महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

कला शाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१  दुरध्वनी क्र. ०२२-२२६२०२३१/३२

क्रमांक:एचएई - २०१८ / चार / 214  दिनांक: 06/03/2018

प्रति,

१. अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविदयालय, मुंबई.

२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविदयालय, औरंगाबाद.

३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविदयालय, नागपूर.

४. प्राचार्य, सर्व संबंधित शासनमान्य अशासकीय कला संस्था.

विषय:- शासकीय उच्चकला परीक्षा - २०१८
परीक्षा साहित्य व प्रश्नपत्रिका वितरण कार्यक्रमाबाबत........

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, सोबत शासकीय उच्चकला परीक्षा २०१८ साठी या संचालनालयाकडून शासकीय उच्चकला परीक्षासाठी वितरण करावयाचे साहित्य व प्रश्नपत्रिका घेवून जाण्यासाठी जिल्हानिहाय कालावधी निर्धारीत केला आहे. निर्धारीत केलेल्या दिवशीच संबंधित परीक्षा केंद्र चालकांनी आपल्या परीक्षा केंद्राचे साहित्य कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई येथून घेवून जाण्याची व्यवस्था करावी.

परीक्षा साहित्य घेणेकरीता केंद्रचालकांनी स्वत: उपस्थित राहणे अशक्य असल्यास त्यांनी त्यांच्या जबाबदारीवर अन्य अध्यापक/कर्मचा-यांना (गट ड संवर्गातील कर्मचारी वगळून) प्राधिकृत करण्यांत यावे.
तसे प्राधिकार पत्र संबंधितांच्या नमुना स्वाक्षरीसह देण्याची व्यवस्था करावी. विषयाच्या अनुषंगाने साहित्य / प्रश्नपत्रिका स्विकारताना ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे. संबंधिताकडे प्राधिकारपत्र व ओळखपत्र नसल्यास साहित्य वितरीत केले जाणार नाही.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव परीक्षा केंद्रसाठी | दिनांक | वार | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर, वर्धा, भंडारा, वाशिम, नांदेड, अमरावती<br>गोंदीया, चंद्रपूर, यवतमाळ, हिंगोली<br>अकोला, बुलढाणा, जालना, परभणी, जळगांव, नंदुरबार<br>लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद, बीड<br>अहमदनगर, पुणे | २२/०३/२०१८ | गुरुवार | सकाळी १०.०० ते सायं ०५.०० |
| २ | सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, धुळे<br>मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | २३/०३/२०१८ | शुक्रवार | सकाळी १०.०० ते सायं ०५.०० |

परीक्षा साहित्य व प्रश्नपत्रिका वितरण व्यवस्था सुलभतेने पार पाडण्याकरिता परीक्षा केंद्र सुचीतील केंद्र चालकांनी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे, ही विनंती. जेणेकरून वितरण व्यवस्था सुलभतेणे पार पाडता येईल.

आपला

प्र.परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.